# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २२/०५/२०२४ (बुधवार) सकाळ**

## अवैध्यरीत्या गाई गौवंशाची वाहतुक करणाऱ्या आरोपींवर कायदेशिर कार्यवाही

दिनांक २१/०५/२०२४ चे ०७.३० वाजता ते ०८.२० वा. दरम्यान पोलीस स्टेशन देवलापार येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असता मुखबीरा द्वारे माहीती मिळाली की, १२ चक्का गाडी क्र. एम. पी—६६/एच—१४७७ वाहनाने जबलपुर ते नागपुर रोडने अवैध जनावराची वाहतुक होत आहे. अशा विश्वसनीय माहीती वरुन पोस्टे समोर नाकाबंदी लावली असता नाकाबंदीचा काही दुर अंतरावर विला ४४ हॉटेल जवळील टर्निंग नागपुर जबलपुर दिशेने एक वाहन ट्रक युटर्न घेवुन जबलपुरचे दिशेने पळुन जातानी दिसुन आला स्टाफने सदर वाहनाचा पाठलाग केला सदर वाहन चालकाने आपले वाहन भरधाव वेगाने व निश्काळजीपणे चालवुन एन एच— ४४ जबलपुर नागपुर रोडचे बाजुला मोरफाटाचे जवळ सोडुन पळुन गेला. सदर वाहनाची पाहणी केली असता वाहनामध्ये १) १३ पांढऱ्या रंगाच्या ०५ लाल रंगाच्या ०१ कोसा/काळा रंगाची, ०२ काळया रंगाची अशा २१ जिवंत गोवंश गाया प्रत्येकी किंमती १५०००/— रू प्रमाणे ३,१५,०००/— रू. २) कालवड ०६ पांढऱ्या व काळी/कोसा, ०१ असे ०७ कालवड प्रत्येकी किंमती १०,०००/— रू प्रमाणे ७०,०००/— रू. ३) ०७ पांढऱ्या रंगाचे, ०१ पांढरा कोसा, ०१ काळा असे ०९ गोवंश गोरे प्रत्येकी किंमती १०,०००/— रू. प्रमाणे ९०,०००/— रू असे एकुण ३७ जिवंत गोवंश (जनावरे ) व ०२ मृत असे ३९ गोवंश जनावरे एकुण किंमती ४,७५,०००/— रू व १२ चक्का ट्रक क्र. एम. पी— ६६/एच १४७७ अंदाजे किंमती २०,००,०००/— रू असा एकुण २४,७५,०००/— रु. चा मुद्देमाल गाई गौवंश जनावरांना अत्यंत क्रुर व निर्यदयतेने वाहनात डांबुन आखुड दोरीने पाय व तोंड बांधुन चारा पाण्याची सोय न करता दाटीवाटीने अपुऱ्या जागेत कोंबुन कत्तलीसाठी अवैद्यरित्या वाहतुक करतांना मिळुन आल्याने सदरचा मुद्देमाल जप्त करुन सदर गुन्हयातील १) १२ चक्का ट्रक क्र. एम. पी— ६६/एच १४७७ चा चालक २) गाडी मालक नामे अजिम खान रा. वार्ड नं २ बजारीया सुभाशचंद बोस दमोह (म.प्र) दोन्ही इसमांविरुद्ध पोस्टे देवलापार येथे कलम २७९, ४२९, १०९ भादवी सहकलम ११(१)(ड) प्रा.छ. अधि सहकलम ५(अ) ९ म.प्रा सं का सहकलम ११९ मपोका १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. श्री. हर्ष पोद्दार पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा.), मा. श्री. रमेश धुमाळ अपर पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा) यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे देवलापार येथील ठाणेदार सपोनि राजेश पाटील, पोहवा रविंद्र डोरले, रविंद्र मेश्राम, पोशि केशव फड, मनिश चोकसे, सचिन येळकर यांनी केली आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर